IMG-20190502-WA0045.jpg

# प्रेस नोट

दिनांक ०२/०५/२०१९

| युनिट | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) गोपीचंद बिकन वाडीले, वय—५० वर्ष, व्यवसाय—नोकरी, पद—शिक्षक, वर्ग ३, जिल्हा मध्यवर्ती कारागृह अमरावती, ह.मु. जेल क्वार्टर क्र. ७६, जिल्हा मध्यवर्ती कारागृह अमरावती. कायम पत्ता—मु.थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे. २) संजय त्र्यंबक घोलप, वय—३७ वर्ष, व्यवसाय—नोकरी, पद—शिक्षक, वर्ग ३, जिल्हा मध्यवर्ती कारागृह अमरावती, ह.मु. गजानन लॉज, अंध विद्यालय रोड, अमरावती. कायम पत्ता—जयहिंद नगर, पेपरमिल समोर, थेरगांव, पुणे—३३. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४७२७/—रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४७२७/—रु. |
| घटनास्थळ | ओम टी स्टॉल, जलसंपदा कार्यालयाच्या समोर, जेल रोड अमरावती. |
| घटना ता. व वेळ | दि.०२/०५/२०१९ चे १४:५० वा. |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदाराचे वडीलांची न्यूज पेपर एजन्सी असून तक्रारदार जिल्हा मध्यवर्ती कारागृह अमरावती येथे पेपर टाकतात. सदर पेपरचे प्रत्येक महिन्याचे बील ते आलोसे क्र. १ वाडीले यांचेकडे देतात. वाडीले हे कारागृहामध्ये कैद्यांना शिकविण्याचे काम करतात तसेच तक्रारदार देत असलेले कार्यालयीन पेपर व कैद्यांचे पेपरचे बिलाचे काम पाहतात. माहे फेब्रुवारी महिन्याचे तसेच मार्च महिन्याचे बिलामधील तक्रारदारास जास्त देण्यात आलेली रक्कम २७२७/—रु. व यापुढे तक्रारदारानेच न्युजपेपर एजन्सीमार्फत पेपर सुरु ठेवण्यासाठी २०००/—रु प्रती महिना असे एकूण ४७२७/—रु. लाचेची मागणी केल्याची तक्रार त्यांनी अँन्टी करप्शन ब्युरो येथे दिली.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीप्रमाणे दि.३०/०४/२०१९ रोजीचे पडताळणीमध्ये आरोपी क्र.१ श्री.वाडीले व आलोसे क्र.२ श्री.घोलप यांनी तक्रारदाराचे पेपर सुरु ठेवण्यासाठी महिन्याचे २०००/—रु. लाचेची मागणी केली तसेच लोकसेवक श्री.वाडीले यांनीसुध्दा पेपर सुरु ठेवण्यासाठी महिन्याचे २०००/—रुपयासह तक्रारदारास फेब्रुवारी व मार्च महिन्याच्या बिलामध्ये २७२७/—रु. जास्त देण्यात आल्याचे भासवून तक्रारदारास एकूण ४७२७/—रूपये लाचेची मागणी केली. तसेच दि.०२/०५/२०१९ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र.१ वाडीले यांनी तक्रारदाराकडून ४७२७/—रु. लाच रक्कम स्विकारल्याने दोन्ही आरोपींताना ताब्यात घेउन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री.श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.राजवंत आठवले, सपोउपनि. श्री.कैलास सानप, पो.हवा.श्रीकृष्ण तालन, नापोकॉ. श्री.प्रमोद धानोरकर, पोशि.राजेश कोचे, पंकज बोरसे तसेच चालक नापोकॉ. अकबर हुसैन यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यानी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :— अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती**
**टोल फ्री क्र. — १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ — २५५२३५५, २५५३०५५.**

( राजवंत आठवले )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती.

Scanned by CamScanner